# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील ११ वा रविवार – १६ जून २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना मोहरीच्या दाण्याप्रमाणे परमेश्वराचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी पवित्र आत्म्याकडून धैर्य व चांगले आरोग्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या देशाच्या घटनेला व परमेश्वराला स्मरून शपथ घेतलेल्या आपल्या सर्व केंद्रिय मंत्र्यांनी कोणत्याही दडपणाला व भ्रष्टाचाराला बळी न पडता जनतेच्या हितासाठी व देशाच्या उत्कर्षासाठी नेहमी प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू स्वर्गाच्या राज्याची तुलना मोहरीच्या दाण्याबरोबर करीत आहेत. दाणे जमिनीत पडून मरतात पण त्यापासून झाडे झुडपे उगवतात. दैनंदिन जीवनातील सुख दुःखाचा धैर्याने सामना करून आपले जीवन प्रभूच्या स्वर्गराज्यात बहरत व फूलत जावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. या नवीन शैक्षणिक वर्षात सर्व विद्यार्थ्यांवर प्रभूचा भरपूर आशीर्वाद असावा, अभ्यास करण्यासाठी त्यांना चांगले आरोग्य लाभावे तसेच त्यांच्या शिक्षकांवर पवित्र आत्म्याचे वरदान असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या गावपरिवारातील सर्वांना चांगले आरोग्य लाभावे, लहान बालकांवर चांगले संस्कार केले जावेत, वयोवृद्धांची योग्य ती काळजी घेतली जावी, स्त्रियांना सन्मानाने वागविले जावे तसेच आपल्या नोकरी व्यवसायावर प्रभूचा वरदहस्त असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.